देण्यात आले.

जिल्हाधिकारी संजय दैने यांनी

यांचा सत्कार करण्यात आला.

(तभा वृत्तसेवा)



# जिल्ह्यात विविध संघटनांच्या वतीने योगदिन

◆ आर्वी, २५ जून

**गांधी विद्यालय**

**आर्वी** : आंतरराष्ट्रीय योगदिना निमित्त स्थानिक गांधी विद्यालयात पतंजली योग समिती, रेड क्रॉस सोसायटी, एन.सी.सी. गीता परिवार, सखी मंचच्या वतीने योगदिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी योग शिक्षक श्रीकांत कलोडे यांनी जीवनात योगाचे महत्त्व विशद करून शरीर स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी नियमित योगाची आवश्यकता असल्याचे सांगून विविध योग प्राणायमाचे धडे दिले. नगराध्यक्ष प्रा. प्रशांत सव्वालाखे, डॉ. अरुण पावडे, डॉ. अनिता भुतडा, विस्तार अधिकारी संतीश कपंटे, मुख्याध्यापक अभय दर्भे, मुख्याध्यापक उषा नागपूरे, उषा वैद्य, डॉ. पावडे, डॉ. सविता बोंदरे, शुभांगी कलोडे, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य, आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक व आभार प्रमोद नाकरे यांनी मानले.

**गो. से. वाणिज्य महाविद्यालय**

गो. से. वाणिज्य महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य अब्दुल बारी तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रकाश चोपडे, प्रा. मधुरीया नायडू उपस्थित होते. याप्रसंगी योग प्राणायमांचे जीवनात महत्त्व लक्षात घेता विद्यार्थ्यांना योग



योग सादर करताना

साधनेबाबत सर्वकष माहिती व्हावी यासाठी विविध योगासनाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. मार्गदर्शन करताना अब्दुल बारी म्हणाले, भारतीय संस्कृतीची जगाला मिळालेली योग ही एक महान देणगी आहे. आपले आयुष्य, प्रकृती, मानसिक स्वास्थ टिकून ठेवायचे असेल तर, प्रत्येकाने दररोज योगसाधना करणे आवश्यक आहे.

जीवनात ताणतणावाचा शरिरावर विपरीत परिणाम होत असतो, त्यामुळे रोगांच्या विळख्यात सापडण्या आधीच योगाचे सर्वोत्तम औषध वापरून स्वतःला स्वस्थ ठेवावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी प्रा. प्रकाश चोपडे यांच्यासह विद्यार्थ्यांच्या चमूने योगप्रकारातील विविध आसन व प्राणायम यांचे प्रात्यक्षिक करून दाखविले. याप्रसंगी प्राचार्य, प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मधुरीया नायडू यांनी, संचालन प्रा. प्रकाश चोपडे यांनी केले. आभार प्रा. मिलिंद शेंडे यांनी केले.

**स्काऊड-गाईड**

जिल्हा क्रीडा संकुलच्या वतीने योगदिनाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी डॉ. पंकज भोयर तर प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय दैने, जिल्हा माहिती अधिकारी मनिषा सावळे, जिल्हा अधिकारी टेभूर्णे, जिल्हा क्रिडा अधिकारी लतिका माने, तालुका क्रिडा अधिकारी पुरूषोत्तम दारव्हाणकर, कॅप्टन प्रा. मोहन गुजरकर, वैशाली अवथळे उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ. पंकज भोयर म्हणाले. योग ही प्राचिन उपचार पद्धती असून यात कोणताही औषधोपचार न घेता आजारांवर नियंत्रण मिळविता येते. योगाभ्यासात योगासाने, प्राणायम व ध्यान आदी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आर. बी. भावेकर, राजहंस जंगले, सतिश वरघने, अनिता चव्हाण, विवेक कहाळे, सुषमा कार्लेकर यांची उपस्थित होती.

**एस. एस. एन. जे महाविद्यालय**

**देवळी** : स्थानिक एस. एस. एन. जे महाविद्यालयात योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पतंजली योग समितीच्या तालुका संघटक निर्मला नांदूरकर, वैष्णवी गावंडे, शिवानी मेघळ यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

शेतकऱ्यांचे उपोषण

दै० भास्कर 1 सप्टें 2019

# अंतरराष्ट्रीय युवा दिवस मनाया




संवाददाता | देवली . एस एस एन जे महाविद्यालय में 23 अगस्त को अंतरराष्ट्रीय युवा दिवस के अवसर पर एच आई वी, एड्स विषय में युवक युवती में जनजागृति उपक्रम चलाया गया।अध्यक्ष के स्थान पर डॉ गणेश मालधुरे, प्रमुख अतिथि प्रा संतोष मोहदुरे, प्रमुख मार्गदर्शक समुपदेशक विजय ओझा, प्रयोगशाला तकनीकीतज्ञ माधुरी भोयर उपस्थित थी। माधुरी भोयर ने एच आई वी प्रतिबंधात्मक उपाय, कारण, एआरटी उपचार विषय पर मार्गदर्शन किया। समुपदेशक विजय ओझा, प्रा संतोष मोहदुरे ने अपने विचार व्यक्त किए। संध्या महिसकर ने युवा दिन की शपथ दी। संचालन प्रियंका करलूके ने तथा आभार प्रदर्शन जयश्री चव्हाण ने किए। सफलतार्थ प्रा प्रभाकर ढाले, प्रा गोपाल हेलोंडे, दिपाली भालकर तथा कर्मचारी वृंद ने सहकार्य किया।

धन

पुरुषोत्तम मुले

संवाददाता | आंजी बडी. स्थानीय

नवराष्ट्र प्लस

शुक्रवार 30 ऑगस्ट 2019

दै. नवराष्ट्र दि. 30/8/19

# आंतरराष्ट्रीय युवा दिन पंधरवडा साजरा



भिडी. देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी युवकांना एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाय, एआरटी औषधोपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गणेश मालधुरे होते. मार्गदर्शक म्हणून प्रा. संतोष मोहदुरे, विजय ओझा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ माधुरी भोयर यांची उपस्थिती होती. माधुरी भोयर यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त युवा वर्गांना एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाय, एआरटीओ औषधोपचाराबद्दल मार्गदर्शन केले. समुपदेशक विजय ओझा यांनी युवकांनी युनायटेड नेशनच्या संकल्पनेनुसार शिक्षणाचा प्रसार करावे, सोबतच रेड रिबन क्लबच्या माध्यमातून गावागावात जनजागृती करावी, असे मत व्यक्त केले. त्यांनी 1097 च्या आरोग्याविषयी केंद्रावर असणारी मार्गदर्शन सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. प्रा. संतोष मोहदरे यांनी आयसीटीसी केंद्रात एचआयव्ही समुपदेशन व रक्त तपासणीचा लाभ घेण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. गणेश मालधुरे यांनी विद्यार्थ्यांनी भयमुक्त व्यसनमुक्त जीवन जगावे, समाजामध्ये जनजागृती करावी, देशासाठी समाजकार्य करण्याचे त्यांनी सांगितले. संध्या म्हैसकर यांनी युवा दिनाची शपथ दिली. संचालन प्रियंका करलुके यांनी केले तर आभार जयश्री चव्हाण यांनी मानले. यशस्वीतेकरिता प्रा. प्रभाकर ढाले, प्रा. गोपाल हेलोंडे, दीपाली भालकर, इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

सकाळ TODAY

वर्धा, बुधवार, २८ ऑगस्ट २०१९





भिडी : पंधरवाड्यात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मान्यवर.

## आंतरराष्ट्रीय युवादिन पंधरवडा

**भिडी :** देवळी येथील एसएसएनजे महाविद्यालयात युवक युवतींमध्ये एड्स जनजागृती निर्माण करण्याकरिता आंतरराष्ट्रीय युवादिन राबविण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गणेश मालधुरे होते. प्रा. संतोष माहदुरे, समुपदेशक विजय ओझा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ माधुरी भोयर यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती. माधुरी भोयर यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या औचित्याने युवा वर्गांना एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाय, कारणे, एआरटी औषधोपचार विषयी मार्गदर्शन केले. विजय ओझा यांनी युवांनी युनायटेड नेशनच्या संकल्पनेनुसार शिक्षणाचा प्रसार करावा सोबतच रेड रिबन क्लबच्या माध्यमतून गावागावात जनजागृती करावी, असे आवाहन केले. प्रा. संतोष मोहदरे यांनी आयसीटीसी केंद्रात एचआयव्ही समूपदेशन व रक्ततपासणीचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा असे मत स्पष्ट केले. अध्यक्षीय मार्गदर्शन डॉ. गणेश मालधुरे यांनी केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी भयमुक्त आणि व्यसनमुक्त जीवन जगावे असे मार्गदर्शन केले. यानंतर संध्या महिसकर हिने युवादिनाची शपथ दिली. कार्यक्रमाचे संचालन प्रियंका करलुके हिने केले. जयश्री चव्हान हिने आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रा. प्रभाकर ढाले, प्रा. गोपाल हेलोंडे, दीपाली भालकर यांच्यासह कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## फेरपरीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सवर्णसंधी

# देवळी येथे युवक-युवती जनजागृती कार्यक्रम



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**देवळी :** आंतरराष्ट्रीय युवादिनानिमित्त येथील एसएसएनजे महाविद्यालयात एआयव्ही एड्सविषयी युवक - युवतीमध्ये जनजागृती कार्यक्रम नुकताच पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गणेश मालधुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. संतोष मोहदुरे, समुपदेशक विजय ओझा, प्रयोगशाळा तंत्रज्ञ माधुरी भोयर उपस्थित होते. यावेळी भोयर यांनी युवकांना एचआयव्ही प्रतिबंधात्मक उपाय, कारणे, एआरटी औषधोपचारविषयी मार्गदर्शन केले. तसेच विजय ओझा, प्रा.संतोष मोहदुरे यांनीही मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ.गणेश मालधुरे यांनी विद्यार्थ्यांनी भयमुक्त, व्यसनमुक्त जीवन जागावे, समाजामध्ये जनजागृतीकरावी आणि देशासाठी समाजकार्याचे काम करावे, असे आवाहन केले. यानंतर संध्या महिसकर हिने युवादिनाची शपथ दिली.

कार्यक्रमाचे संचालन प्रियंका करलुके हिने केले. उपस्थितांचे आभार जयश्री चव्हाण हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतकरिता प्रा.प्रभाकर ढाले, प्रा. गोपाल हेलोंडे, दिपाली भालकर तसेच कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

ये अण्णाभाऊ

संजय बहुउद्देशीय
, आलोडा (बो.)
गुंजखेडा येथे
जयंतीचा कार्यक्रम
डला.
ा प्रमुख अतिथी
जिक कार्यकर्ते
े, सतीश गवळी
होती. उपस्थितांच्या
ाऊ साठे यांच्या
ण करण्यात आले.
यांनी अण्णाभाऊ
न कार्यावर माहिती
कार्य समाजाला
सून प्रत्येकाने ते
जे, असे मत व्यक्त
तरही उपस्थितांनी
े. कार्यक्रमाचे
ा वरघने यांनी
ंचे आभार सूरज
ले. कार्यक्रमाच्या
इशा महिला बचत
संगीता इंगोले,
, किरण इंगोले,
मटेके, पाटील व
केले.

ीच्या वतीने
ा आज

्या दोन वर्षांत
रंजा तालुक्यात
घटकाला न्याय
ाजपाचे प्रदेश
स्य सुधीर दिवे
तीच्या वतीने २१
काळी ६ वाजता
येणार आहे.
ाई कृपा लॉन
कार्यक्रमाच्या
.रामदास तडस
ळी माजी खा.
बासचे सभापती
ळे, महाऑरेंजचे
करे, नगराध्यक्ष
माजी नगराध्यक्ष
ो, बाबासाहेब
े यांची उपस्थिती
ा कार्यक्रमाला
ारिकांनी उपस्थित
वाहन ओबीसी
वतीने करण्यात

# रासेयो युवकांमध्ये सामाजिक भान निर्माण करणारी व्यवस्था : बोबडे

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी




देवळी : राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन युवकांमध्ये सामाजिक भान निर्माण करणारी व्यवस्था असून त्यामाध्यमातून आपले व्यक्तिमत्त्व घडविण्याच्या बऱ्याच संधी आहेत, असे मत अनंतकुमार बोबडे यांनी व्यक्त केले.

स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयातील रासेयो पथकाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना बोबडे म्हणाले की, युवकांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना भारतीय संस्कृतीतील उच्चतम जीवन मूल्याचा अभ्यास करावा, ती तत्त्वे आपल्या जीवनात उतरावीत, त्यातून समर्थ युवा घडेल व मग देश महासत्ता होण्याच्या मार्गावर असताना या देशातील युवा वर्गही सामाजिक भान असणारा हवा तसेच त्यांच्या अंतःकरणावर भारतीय संस्कृती व परंपरांचा संसकार असणे आवश्यक आहे. त्यातून सुसंस्कृत समाज निर्माण होईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. गणेश मालघुरे होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शासन व समाज यांच्यातील दुवा व्हावे, त्यांनी माहितीदूत बनून शासकीय योजनांची माहिती. समाजापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. संतोष मोहदुरे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन मिनाक्षी ठाकरे यांनी केले. उपस्थितांचे आभार जयश्री चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाला रासेयोचे विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ | वर्धा मंगळवार, २४ सप्टेंबर २०१९

# विद्यार्थ्यांनी जीवनमूल्याचा अभ्यास करावा

## अनंतकुमार बोबडे यांचे मत : राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्‌घाटन

सकाळ वृत्तसेवा

देवळी, ता.२३ : युवकांनी महाविद्यालयात शिक्षण घेताना भारतीय संस्कृतीतील उच्चतम जीवनमूल्याचा अभ्यास करावा आणि ती तत्त्वे आपल्या जीवनात उतरावीत, त्यातून युवा घडेल व देश समर्थ होईल, असे मत अनंतकुमार बोबडे यांनी व्यक्त केले.

स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्‌घाटन झाले. यावेळी उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन युवकांमध्ये सामाजिक आवड व चांगले संस्कार घडवणारी व्यवस्था आहे. यातून अनेक युवकांना व्यक्तिमत्त्व घडविण्याची संधी प्राप्त झाल्याचे बोबडे यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गणेश मालधुरे होते. ते म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शासन व समाजातील दुवा बनून समाजामध्ये जनजागृती करून चांगली संस्कृती, देशभावना, बंधुभाव निर्माण करण्याकरिता कामे करावे. जेणेकरून संस्कृत समाज निर्माण होईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संतोष मोहदरे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य ाणि विविध उपक्रमांची माहिती दिली. संचालन मीनाक्षी ठाकरे यांनी तर जयश्री चव्हाण हिने आभार मानले.




देवळी : मार्गदर्शन करताना अनंतकुमार बोबडे, गणेश माळधुरे आदी.

---

च्या
। जप्त

२३ : आगामी निवडणुकीच्या परिसरात शांतता समुद्रपूर पोलिस त महिला पोलिस रातील एका घरी रूसाठा जप्त करीत ली.

ठाण्याच्या पोलिस कुटमाटे यांना हितीच्या आधारावर मालकर वॉर्डातील या घरी छापा टाकून . यावेळी त्यांच्या ७२ हजार रुपये १५ पेट्या आढळून लिसांनी दारूसाठा वेलास बेलेकर याला

गेदार हेमंत चांदेवार नवनियुक्त पोलिस कुटेमाटे, जिल्हा अरविंद येनूरकर, ष गेडाम, एजाज पोलिस कर्मचाऱ्यांनी

# युवकांनी उच्चतम जीवन मूल्यांचा अंगिकार करावा

## अनंतकुमार बोबडे : रासेयोचे उद्‌घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**देवळी :** स्थानिक एसएसएनजे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. गणेश मालधुरे तर अतिथी म्हणून अनंतकुमार बोबडे उपस्थित होते.



मार्गदर्शन करताना अनंत बोबडे.

यावेळी बोलतांना बोबडे यांनी महाविद्यालयीन युवकांमध्ये सामाजिक भान निर्माण करणारी व्यवस्था म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व असल्याचे सांगितले. व्यक्तीमत्व घडवित असतांना युवकांनी भारतीय संस्कृतीतील उच्चतम जीवनमुल्यांचा अभ्यास करावा. समर्थ युवा घडविण्यासोबतच देश महासत्ता होण्यासाठी अशी जीवनमूल्ये तत्वे आपले जीवनात उतरावित तसेच परंपरा व संस्काराचा अंगीकार करावा असे विचार बोबडे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन मिनाक्षी ठाकरे यांनी केले तर आभार जयश्री चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची व प्राध्यापकवृंदांची उपस्थिती होती.



देशोन्नती वर्धा
वर्धा
बुधवार दि. २५ सप्टेंबर २०१९


# एस.एस.एन.जे. महाविद्यालयात रासेयो पथकाचे उद्घाटन

*तालुका प्रतिनिधी/ २४ सप्टेंबर*

**देवळी :** राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयीन युवकांमध्ये सामाजीक भान निर्माण करुन युवकांना आपले व्यक्तीमत्व घडविण्याचा बऱ्याच संधी आहेत. असे प्रतिपादन प्रा. अनंत बोबडे यांनी व्यक्त केले ते स्थानिक एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील रा.ये.सो. पथकाचे उद्घाटन करतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की,युवकांनी महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना भारतीय संस्कृतीतील उच्चतम जीवनमुल्यांचा अभ्यास करावा ती तत्वे आपल्या जीवनात उतरावीत त्यातुन समर्थ युवा घडेल व मग देश समर्थ होईल.




देश महासत्ता होणाच्या मार्गावर असतांना या देशातील युवावर्गही सामाजीक भान नसणारा हवा. तसेच त्यांच्या अंतःकरणावर भारतीय संस्कृती व परंपरेचा संस्कार असणे आवश्यक आहे.त्यातुन सुसंस्कृत समाज निर्माण होईल.

प्रास्ताविक व उपस्थित मान्यवरांचा परिचय रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.संतोष मोहदरे यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.गणेश मालधुरे उपस्थित अध्यक्षणीय भाषणात म्हणाले की, राष्टीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी शासन व समाज यांच्यातील दुवा व्हावे. त्यांनी माहीतीदुत बनुन शासकीय योजनेची माहीती समाजापर्यंत पोहोचवावी.

कार्यक्रमाचे संचालन मिनाक्षी ठाकरे यांनी केले .तर जयश्री चव्हाण यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमाला रा.से.यो.चे विद्यार्थी तसेच इतर विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

www.tarunbharat.net
तरुण भारत

## महत्त्वाचे



### एसएसएनजे महाविद्यालयात एडस्‌वर मार्गदर्शन

**देवळी** : एसएसएनज महाविद्यालयात एडस् जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्रा. गणेश मालधुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून समुपदेशक विजय ओझा, माधुरी भोगे, प्रा. मोहदुरे उपस्थित होते. याप्रसंगी प्रा. मालधुरे यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्ही विषयी मार्गदर्शन करून, अंधश्रद्धा घालवून सुदृढ समाजाच्या निर्माणासाठी कार्य करावे असे आवाहन केले. संचालन प्रियंका करलुके यांनी तर आभार प्राजक्ता ठाकरे यांनी मानले. यशस्वितेकरिता प्रा. ढाले, प्रा. दवडे, प्रा. हेलोंडे, प्रा. मेन्युअल तसेच विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.